स्थापत्य अभियांत्रिकी सहाययक गट क या संवर्गातील कर्मचा-यांना कनिष्ठ अभियंता गट क या पदावर पदोन्नती देणेबाबत.

जिल्हा परिषद अहिल्यानगर.
सार्वजनिक बांधकाम उत्तर विभाग
जिल्हा परिषद आदेश क्र.बांध/आस्था-३/७४८ /२०२५
अहिल्यानगर दिनांक २८/०३ /२०२५

वाचा :- १.महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (सेवा प्रवेश) नियम १९६७ मधील परिशिष्ट ६ नियम ५
२.ग्रामविकास विभाग महाराष्ट्र शासन अधिसूचना दि.०२ फेब्रुवारी,२००६
३.मा.अवर सचिव,महाराष्ट्र शासन,सामान्य प्रशासन विभागकडील पत्र क्रमांक बीसीसी-२०१७/प्र.क्र.३१२अे/१६-ब दिनांक.२९/१२/२०१७
४.पदोन्नती निवड समितीचे मंजुर इतिवृत्त दिनांक १०/०३/२०२५

जिल्हा परिषद अहिल्यानगर अंतर्गत जिल्हा तांत्रिक सेवा वर्ग-३ (दुय्यम अभियांत्रिकी) द्वितीय श्रेणी स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक या पदावर कार्यरत असलेल्या कर्मचा-यांना कनिष्ठ अभियंता गट-क या पदावर वेतनबॅन्ड एस- १४ ३८६०० - १२२८०० अधिक प्रचलित दराने मिळणारे भत्ते मध्ये निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात खालील अटीच्या अधिन राहून रकाना क्रमांक.५ मध्ये नमूद केलेल्या ठिकाणी पदस्थापना देण्यात येत आहे. पदोन्नती दिलेली पदस्थापना ही मा.सर्वोच्च न्यायालयात राज्य शासनाने दाखल केलेली विशेष अनुज्ञा याचिका क्रमांक.२८३०६/२०१७ च्या निर्णयांच्या अधिन राहुन खुल्या प्रवर्गातील कर्मचा-यांना पदोन्नती देण्यास कोणतीही वैधानिक अडचण नसल्याने तुर्तास पदोन्नतीच्या कोट्यातील रिक्त पदे निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सेवाज्येष्ठतेनुसार मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिन राहुन तदर्थ पदोन्नतीने भरणेत येत आहे.

| अ. नं. | कर्मचा-याचे नांव | सध्याचे कार्यालय | निवडीचा प्रवर्ग | पदोन्नतीने नियुक्तीचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | श्री. बाळु नामदेव कांबळे | जि.प.ल.पा.उपविभाग अकोले | जेष्ठतेनुसार (व्यावसायिक परिक्षा उत्तीर्ण सुट) | जि.प.ग्रा.पा.पु उपविभाग अकोले |

अटी व शर्ती -

१. सदरची पदोन्नती ही मा.सर्वोच्च न्यायालयात राज्य शासनाने दाखल केलेली विशेष अनुज्ञा याचिका क्रमांक.२८३०६/२०१७ च्या न्यायालयीन निर्णयांच्या अधिन राहुन निव्वळ तात्पुरती स्वरुपात देणेत येत आहे.
२. सदर पदोन्नती ही तात्पुरत्या स्वरुपाची असल्यामुळे पदोन्नतीच्या दिनांकापासून सेवाज्येष्ठतेचा हक्क सांगता येणार नाही.
३. शासन निर्णय दिनांक.०१/०४/२०१०, दिनांक.०२/०३/२०१९ मधील तरतुदींनुसार सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत पहिला/दुसरा/तिसरा लाभ (पदोन्नतीच्या पदाचा) मंजूर

Scanned with OKEN Scanner

केलेल्या कर्मचा-यांनी सदर पदोन्नती नाकारल्यास त्यांना देण्यात आलेला लाभ काढून घेण्यात येईल.

४. नेमणूकीच्या ठिकाणी विहित कालावधीत हजर न झाल्यास तसेच नेमणूकीचे पदस्थापनेत बदल करणेसाठी कोणत्याही प्रकारचा दबाव आणल्यास महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपिल) नियम १९६४ मधील नियम ४ नुसार कारवाई करणेत येईल.

५. संबंधीत कार्यालय प्रमुखांनी कर्मचा-यास पदोन्नतीने नियुक्तीचे ठिकाणी हजर होणेसाठी पर्यायी स्थानिक व्यवस्था करुन तात्काळ कार्यमुक्त करावे. कार्यालयाची निकड विचारात घेऊन पदोन्नती देण्यात आलेली असल्याने ०७ दिवसाचे आत पदोन्नतीच्या ठिकाणी हजर व्हावे. अन्यथा सेवा ज्येष्ठता डावलली जाईल. तसेच सदरची पदोन्नती स्विकारत/नाकारत असलेबाबतचे लेखी पत्र संबधिताने त्यांचे कार्यालय प्रमुखांमार्फत सात दिवसांत जि.प.सा.बा.उत्तर विभाग अहिल्यानगर येथे सादर करावे.

६. श्री.कांबळे यांची नियुक्ती ग्रामीण पाणी पुरवठा विभागांतर्गत त्यांनी दिलेल्या ग्रा.पा.पु विभागाचा विकल्पानुसार शासन निर्णय दिनांक.२१/१०/२०११ नुसार त्यांच्या नावाचा समावेश सेवा जेष्ठता यादीत करावा. व ग्रामीण पाणी पुरवठा विभागाकडील लेखाशिर्षाखाली वेतन व भत्ते अदा करावे.

७. श्री.कांबळे यांची कनिष्ठ अभियंता या पदावर पदोन्नती झाली असल्याने त्यांना ग्रामीण पाणी पुरवठा विभाग जिल्हा परिषद अहिल्यानगर यांनी त्यांचे पदोन्नतीच्या कोटयातील मंजूर पदानुसार विहित बिंदू क्रमांकावर दर्शवावे.

८. सदरचे आदेशाची नोंद संबंधिताचे मुळ सेवा पुस्तकाल घेण्यात यावी.

सदर आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक 202503261300013 असा आहे.

(आशिष येरेकर भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, अहिल्यानगर

प्रति,

श्री.बाळु नामदेव कांबळे, स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक
द्वारा, उपअभियंता जि.प.ल.पा.उपविभाग अकोले

प्रत :- माहितीस्तव व पुढील आवश्यक त्या कार्यवाहीस्तव रवाना.

१. कार्यकारी अभियंता ग्रापापु विभाग अहिल्यानगर
२. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जि.प. अहिल्यानगर
३. गट विकास अधिकारी, पंचायत समिती अकोले/ ........
४. उपअभियंता ग्रा.पा.पु उपविभाग
५. निवड नस्ती

Scanned with OKEN Scanner